महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९१४
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : १४४२/गट-क संयुक्त(पूर्व)/२०२३/२४ दिनांक :१२ सप्टेंबर, २०२३

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय :-** महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क संयुक्त (पूर्व) परीक्षा २०२३ लिपिक- टंकलेखक (मराठी / इंग्रजी), मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच राज्य शासनाची महाराष्ट्रातील विविध कार्यालये या संवर्गाच्या निकालाबाबत.

**संदर्भ :-** जाहिरात क्रमांक ०१/२०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० एप्रिल,२०२३ रोजी आयोजित महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क संयुक्त (पूर्व) परीक्षा २०२३ मधील, लिपिक - टंकलेखक (मराठी / इंग्रजी), मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच राज्य शासनाची महाष्ट्रातील विविध कार्यालये या संवर्गासाठी विविध नियुक्ती प्राधिकारीबाबत विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक १२ सप्टेंबर,२०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदांकरीता पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांनी दिलेला नियुक्ती प्राधिकारी विकल्पाबाबतचा तपशील स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी मुख्य परीक्षेसाठी विहित कालावधीत अर्ज करणाऱ्या तसेच परीक्षा शुल्क भरणाऱ्या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल.

**३.** आवश्यक त्या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**४.** मुख्य परीक्षेचा संयुक्त पेपर क्रमांक १ व संवर्गनिहाय स्वतंत्र पेपर क्रमांक २ च्या तारखा मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये कळविण्यात येतील..

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल.

**७.** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने आवश्यक माहिती तसेच परीक्षा शुल्क विहित मुदतीत विहित पद्धतीने सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरीता स्वीकारार्ह ठरतील.

ठिकाण : नवी मुंबई

उप सचिव (अराजपत्रित परीक्षोत्तर)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,